# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/ १८४१ दि. ०१/०७/२०२१

<u>प्रसिद्धी पत्रक</u>

# मियावाकी वनाची निर्मिती करून पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने म्हाडाचे महत्वाचे पाऊल - पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे

## म्हाडा मुख्यालयातील निसर्ग उपवन मियावाकी वनाचे उद्‌घाटन

मुंबई, दि. ०१ जुलै, २०२१ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) या गृहनिर्मितीतील अग्रगण्य शासकीय संस्थेने मियावाकी वनाची निर्मिती करून पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल टाकले आहे आणि सामाजिक बांधिलकीचा वसा जोपासला आहे, असे प्रतिपादन पर्यावरण मंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनी आज केले.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत मिशन ग्रीन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून वांद्रे पूर्व येथील म्हाडा मुख्यालयाच्या प्रांगणात 'निसर्ग उपवन' या मियावाकी पद्धतीच्या वनाचे उद्‌घाटन श्री. आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

श्री. ठाकरे म्हणाले की, शुद्ध हवा व पाणी यावर प्रत्येक नागरिकाचा नैसर्गिक हक्क आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जास्तीत जास्त झाडे लावून पर्यावरणाच्या संवर्धनाकरिता आपली जबाबदारी उचलावी. किमान जागेत कमाल प्रमाणात झाडांची वाढ करता येते हे जपानी पद्धतीच्या मियावाकी वनांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच म्हाडाच्या प्रांगणात ४० वेगवेगळ्या प्रजातींची ३०० झाडे लावण्याचा उपक्रम माझी वसुंधरा अभियानांतर्गत राबविण्यात आला आहे. म्हाडा हे एक लोकाभिमुख कार्यालय आहे येथे अनेक नागरिक आपल्या कामासाठी भेट देत असतात. अभ्यंगतांना व म्हाडा कार्यालयातील कर्मचाऱ्यांना या वनाचा नक्कीच लाभ होईल, असेही श्री. ठाकरे यांनी सांगितले.

यावेळी मुंबईच्या महापौर श्रीमती किशोरी पेडणेकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनिल डिग्गीकर, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. अरुण डोंगरे, मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. योगेश म्हसे, म्हाडाचे सचिव श्री. राजकुमार सागर, सहमुख्य अधिकारी श्री. जीवन गलांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनीषा जायभाये-धुळे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, अभियानाचे ब्रँड अँबेसेडर श्री. सुभोजीत मुखर्जी, श्री. अमित सावंत आदी उपस्थित होते.

श्री. विनोद घोसाळकर म्हणाले की, म्हाडाच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाने अल्पावधीत 'निसर्ग उपवन' या मियावाकी वनाच्या निर्मितीत केलेल्या सहकार्याबद्दल संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचे

त्यांनी कौतुक केले. मियावाकी वनांबद्दल माहिती देताना ते पुढे म्हणाले की, मियावाकी वनामध्ये झाडांची नियमित जोपासना करण्यासाठी दोन ते तीन वर्षांचा कालावधी लागतो आणि त्यानंतर ही झाडे नैसर्गिक पद्धतीने वाढतात आणि त्यांची उंची एका वर्षातच त्या सुमारे पाच फुटांपर्यंत पोहोचणार आहे. सर्वसाधारण कालावधीपेक्षा निम्म्या कालावधीत झाडे वाढतात. तसेच त्या झाडांमधील अंतरही तुलनेने कमी असल्याने ती घनदाट वाढतात, अशी माहिती त्यांनी याप्रसंगी दिली. म्हाडातील मियावाकी वने विकसित करताना देशी, औषधी प्रजातीच्या वृक्षांच्या अधिक महत्त्व दिले आहे. फळझाडे, फुलझाडांचा समावेश असलेल्या झाडांमध्ये पळस, बेहडा, सावर, सीताफळ, बेल, पेरू, सीता अशोक, हरडा, खैर, बदाम, काजू, रिठा, बकुळ, अर्जुन, आवळा आदी कित्येक प्रजातींचा समावेश असल्याचे श्री. घोसाळकर यांनी सांगितले.

यावेळी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी म्हाडातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्या माहे मे-२०२१ मधील एक/दोन दिवसांच्या वेतन कपातीच्या माध्यमातून अंशतः जमा झालेल्या ३१ लाख ५० हजार रुपयांचा धनादेश श्री. विनोद घोसाळकर यांच्या हस्ते श्री. आदित्य ठाकरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

श्री. ठाकरे यांच्या हस्ते म्हाडातील मियावाकी वनाच्या उभारणीत योगदान देणाऱ्या म्हाडातील उपअभियंता श्री. भावेश गायकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, श्री. सर्जेराव आढाव, श्री. सी. जी. गोसावी यांचा प्रशस्ती पत्र देऊन सन्मान करण्यात आला.

--------*****************-------




माझी वसुंधरा अभियान
म्हाडा
मिनी फॉरेस्ट
(निसर्ग उपवन)
मा.ना.श्री.आदित्यजी ठाकरे


मिनी फॉरेस्ट